MHRT050000862025

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १८.०१.२०२५ |
| नोंदणी तारीख | : | १८.०१.२०२५ |
| निकाल तारीख | : | ०४.०५.२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस |
| | | ०१ ०३ १७ |

भाग 'अ'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i))

**खेड येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.२) यांचे न्यायालयात**

**(पिठासिन अधिकारी डी. जी. म्हस्के)**

**(जाहीर दिनांक ०४.०५.२०२६)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२८/२०२५**

(गु.र.क्र.४०६/२०२४ खेड पोलीस ठाणे, खेड)

**निशाणी क्रमांक ९ लगत**

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | | **महाराष्ट्र सरकार**<br>पोलीस निरीक्षक, खेड पोलीस ठाणे, खेड,<br>ता. खेड, जि. रत्नागिरी |
| **प्रतिनिधीत्व** | | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीम. ए. ए. सोलंकी** |
| **आरोपी** | १. | **रविंद्र बंडु मोहिते,**<br>वय – ३६ वर्षे,<br>रा. खारी, पो. सुसेरी, ता. खेड, जि. रत्नागिरी. |
| **प्रतिनिधीत्व** | | **आरोपी करीता वकील श्री. पी. एस. तलाठी** |

भाग 'ब'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | १६.१२.२०२४ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | १६.१२.२०२४ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | १८.०१.२०२५ |

| | |
|---|---|
| आरोपीचे प्रतिकथन नोंदविल्याची तारीख | ०२.०८.२०२५ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | २८.१०.२०२५ |
| निकालाची आरक्षीत तारीख | नमुद नाही. |
| निकालाची तारीख | ०४.०५.२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | लागू नाही. |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रविंद्र बंडु मोहिते | दि. १६.१२.२०२४ रोजी बी.एन.एस.३५(३) प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे. | ०२.०८.२०२५ | महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ चे कलम १२(अ) | निर्दोष मुक्त केले. | लागु नाही | निर्दोष मुक्त केल्यामुळे लागू होत नाही. |

भाग 'क'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (**iii**))

## सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

## अ. सरकारी

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.१ | अनिकेत अशोक घडशी | पंच साक्षीदार |

## ब. बचावाचे साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही. | | | |

## क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही. | | | |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | पी१/पीडब्ल्यू१ | घटनास्थळ पंचनाम्यावरील साक्षीदार क्र.१ ची सही |

### ब. बचाव

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

### क. न्यायालयीन निशाण्या

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

### मुद्देमाल

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | रु.१००/- च्या चार नोटा, रु.५०/- च्या तीन नोटा, रु. २०/- च्या पाच नोटा, रु. १०/- ची एक नोट अशी एकूण रोख रक्कम रु.६६०/-. |
| २. | -- | एक अर्धवट फाटलेले पावती पुस्तक |
| (सदर मुद्देमाल न्यायालयात जमा नाही.) | | |

## न्यायनिर्णय

## (जाहीर दिनांक-०४.०५.२०२६)

सदरचा खटला हा आरोपी विरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ चे कलम १२(अ) प्रमाणे शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यासाठी चालविण्यात आला.

## २. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत पुढीलप्रमाणे-

फिर्यादी पोहेकॉ ४७६ प्रकाश पवार यांना मिळालेल्या बातमीनुसार ते व इतर कर्मचारी तसेच दोन पंचांना घेवून दि.१६.१२.२०२४ रोजी १८.१५ वा.चे सुमारास मौजे भरणे नाका मोरे चिकन सेंटर समोर, ता. खेड, जि. रत्नागिरी येथे छापा

टाकला असता त्याठिकाणी आरोपी हा गैरकायदा, विनापरवाना कल्याण मटका नावाचा जुगार खेळण्यासाठी लागणारे साहित्य व रोख रक्कम आपले ताब्यात बाळगले स्थितीत मिळून आला म्हणून त्याचे विरुध्द फिर्याद दाखल केली.

**३.** सदर फिर्यादीवरून आरोपी विरुध्द गु.र.नं.४०६/२०२४ नोंदविण्यात आला. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी सदर गुन्ह्याचे तपासकाम केले. त्यांनी तपासकामी साक्षीदारांचे जाब-जबाब नोंदविले. आरोपीस अटक केली. तपासाअंती आरोपी विरुध्द पुरावा मिळून आल्याने महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ चे कलम १२(अ) प्रमाणे दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** मी आरोपीला महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ चे कलम १२(अ) या गुन्ह्याचा तपशिल (नि.९) वाचून व समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा नाकबुल करून संपरिक्षेची मागणी केली. आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने या न्यायनिर्णयाच्या 'भाग क' मधील नमुद पुराव्यांचा आधार घेतला. अभियोग पक्षास पुरेशी संधी देवूनही त्यांना उर्वरीत साक्षीदारांना न्यायालयात उपस्थित ठेवण्यात यश न आल्याने त्यांचा पुरावा बंद केला. आरोपी विरुध्द गुन्हा दर्शक पुरावा न आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ नुसार निवेदन वगळण्यात आले.

**५.** दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. सदर प्रकरणाच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी मी खालील मुद्दे प्रस्थापित केले आहेत. सदरचे मुद्दे व त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि.१६.१२.२०२४ रोजी १८.१५ वा.चे सुमारास मौजे भरणे नाका मोरे चिकन सेंटर समोर, ता. खेड, जि. रत्नागिरी येथे हा गैरकायदा, विनापरवाना | |

| | | |
|---|---|---|
| | कल्याण मटका नावाचा जुगार खेळण्यासाठी लागणारे साहित्य व रोख रक्कम आपले ताब्यात बाळगले स्थितीत मिळून आला व त्याने महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ चे कलम १२(अ) प्रमाणे गुन्हा केला असल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी.** |
| २. | अंतिम आदेश ? | **निर्दोष मुक्त केले.** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र. १ बाबत –**

६. महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ चे कलम १२(अ) प्रमाणे गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षाने आरोपीने जुगार खेळासाठी लागणा–या साहित्याचा वापर करून गैरकायदा, बिगरपरवाना जुगार–मटका नावाचा जुगार खेळ खेळवित होता हे निःसंशयरित्या शाबीत करणे गरजेचे आहे.

७. आरोपी विरुध्द गुन्ह्याच्या सिध्दतेसाठी अभियोग पक्षातर्फे अनिकेत (सा.क्र.१) हे पंच तपासले असून त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यांना फितूर घोषित केले. अभियोग पक्षाने त्यांचा उलटतपासाप्रमाणे जबाब नोंदवला. त्यांच्या जबाबात अभियोग पक्षास मदत होईल असे कोणतेही कथन आले नाही.

८. आरोपी हे त्याच्या ताब्यात जुगाराचे साहित्य बाळगून जुगार खेळ खेळवित असल्याचे कथन लक्षात घेता आरोपी घटनास्थळी जुगाराचा खेळ खेळवित असल्याची बाब प्रत्यक्षदर्शी पाहिली असे कथन करणारा कोणताही साक्षीदार याकामी अभियोग पक्षाने तपासलेला नाही. घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही. अभियोग पक्षाने याकामी इतर साक्षीदारांना तपासलेले नाही. त्यामुळे निव्वळ सा. क्र.१

यांच्या साक्षीवरुन आरोपीने गुन्हा केल्याचे शाबित होत नाही. अभिलेखावरील पुराव्यावरुन सदर आरोपी विरुदध निव्वळ संशयावरुन गुन्हा दाखल केला असल्याचे दिसुन येते.

९. फौजदारी खटल्यांमध्ये आरोपी विरुध्द गुन्हा शाबीतीकरीता अभियोग पक्षाने संशयापलीकडे जावून आरोप सिध्द करणे गरजेचे असते. यदाकदाचित अशा प्रक्रियेत संशयाचा एक जरी धागा निर्माण करण्यास आरोपी यशस्वी ठरला असेल तर त्याचा फायदा आरोपीला मिळतो. या खटल्यामध्ये आरोपी विरुध्द गुन्हा शाबीत होण्याइतपत सबळ पुरावा अभियोग पक्षातर्फे पटलावर आणलेला नाही त्यामुळे संशयाचा फायदा आरोपीला देण्यात येतो.

**१०.** एकंदरीत, वर नमुद विवेचनाअंती आरोपी विरुध्द गुन्हा शाबीत होण्याकरीता सबळ पुरावा अभियोग पक्षातर्फे पटलावर आणणे गरजेचे होते परंतु अभियोग पक्षास त्यामध्ये अपयश आलेले आहे. त्यामुळे आरोपीने गुन्हा केला असल्याचे शाबीत झाले असे म्हणता येणार नाही. यास्तव मुद्दा क्र.१ बाबत माझे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ बाबत** –

**११.** प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपीने महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ चे कलम १२(अ) प्रमाणे गुन्हा केल्याचे सिध्द करण्यात अभियोग पक्ष अपयशी ठरल्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्ततेस पात्र आहे.

**१२.** जप्त मुद्देमालावर आज अखेर कायदेशीर हक्क व अधिकार असलेल्या व्यक्तीने मालकी असल्याचा दावा केलेला नाही. सदरचा मुद्देमाल न्यायालयात जमा नाही त्यामुळे या न्यायनिर्णयाच्या मुद्देमाल रकान्यातील जप्त मुद्देमाल अ.क्र.१ रोख रक्कम रु.६६०/– ही अपील कालावधीनंतर सरकार जमा करण्यासाठी तसेच दोषारोपातील नमूद मुद्देमाल अ.क्र.२ हा उपयोगशून्य असल्याने त्याची अपील

कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यासाठी आदेशित करणे योग्य होईल. सबब, मी मुद्दा क्र.२ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपीची महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ चे कलम १२(अ) अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यामधून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक जातमुचलके व जामिनदारांची बंधपत्रे रद्द करण्यात येते.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ प्रमाणे रक्कम रु.५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र व तेवढ्याच रक्कमेचा जामिनदाराचे बंधपत्र सात दिवसांचे आत सादर करावे.

४. जप्त मुद्देमाल रोख रक्कम रु.६६०/- ही अपील कालावधीनंतर सरकार जमा करावी.

५. जप्त मुद्देमाल एक अर्धवट फाटलेले पावती पुस्तक हे अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात टंकलिखित करुन जाहीर करण्यात आला.)

Digitally signed by MHASKE DADA GOPINATH
Date: 2026.05.04 15:34:01 +0530

**(डी. जी. म्हस्के)**

**दिनांक - ०४.०५.२०२६**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२) खेड, ता. खेड**

*मनोजभाई जेठाभाई परमार (रोहित) विरुद्ध गुजरात राज्य, फौजदारी अपील क्रमांक 2973/2023, दिनांक 15.12.2025* रोजी दिलेल्या निर्णयात भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तुत प्रकरणातील निकालाचा परिशिष्ट किंवा समारोपाचा भाग.

## सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.१ | अनिकेत अशोक घडशी | पंच साक्षीदार |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | पी१/पीडब्ल्यू१ | घटनास्थळ पंचनाम्यावरील साक्षीदार क्र.१ ची सही |

## मुद्देमाल

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | रु.१००/- च्या चार नोटा, रु.५०/- च्या तीन नोटा, रु. २०/- च्या पाच नोटा, रु. १०/- ची एक नोट अशी एकूण रोख रक्कम रु.६६०/-. |
| २. | -- | एक अर्धवट फाटलेले पावती पुस्तक |
| (सदर मुद्देमाल न्यायालयात जमा नाही.) | | |

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this pdf file Judgment/order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Clerk | : | Shri. J. D. Ambekar |
| Court Name | : | 2nd Jt. CJJD & JMFC, Khed |
| Date of Decision | : | 04.05.2026 |
| Judgment /Order signed by Presiding Officer on | : | 04.05.2026 |
| Judgment /Order uploaded on | : | 04.05.2026 |